

# शिक्षणोपनिषद्

## (वेदाध्ययनाय प्रवर्तनाय)

डॉ. वसुधा विनोद देव





## प.पू.स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती

**प्रमुख आचार्य**
**चिन्मय सांदीपनी आश्रम**
**कोल्हापूर**

आधुनिक शिक्षणातून मानवाला फक्त आपल्या सभोवतालचे ज्ञान (Knowledge around the Self) भरपूर लाभले आहे, पण आपल्या बाबतचे ज्ञान (Knowledge about the Self) नाही. परिणामतः विक्षिप्त मनामुळे सामाजिक स्वास्थ्य, आपसातील प्रेम, आदर संबंध व शांतता नष्ट होत चालली आहे. त्यामुळे विज्ञानाच्या विकासाला आध्यात्मिक विचाराची जोड देणे, ही काळाची गरज आहे. 'व्यक्तिविकासाद्वारे राष्ट्रविकास–जगताचा विकास' (World development through individual development) हे शिक्षणाच्या विकासाचे मुख्यसूत्र परम पूज्य गुरुदेवांनी निर्देशित केले आहे.

# चिन्मय - शिक्षणोपनिषद्

(वेदाध्ययनाय प्रवर्तनाय)

अर्थात्

(शिक्षणतज्ञ स्वामी चिन्मयानंद यांचे शिक्षणावरिल संक्षिप्त विचार)


प्रेरणा व मार्गदर्शन

**प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती**


शब्दांकन

**डॉ. वसुधा विनोद देव**

अकोला


**श्री मंगेश प्रकाशन**

श्री शांतादुर्गा निवास, तरुणभारतजवळ,

२३, नवी रामदासपेठ, नागपूर—४४० ०१०

श्री मंगेश प्रकाशन
२३ नवी रामदासपेठ, नागपूर—४४० ०१०
फोन नं. : ०७१२-२४३७२७६

© श्री विनोद दत्तात्रय देव, अकोला
फोन : ९४२२९५९७६३

पहिली आवृत्ती २००९

ISBN No. 978-81-89904-47-0

किंमत रु. २००/- फक्त

टाईपसेटिंग :
हरसुलकर कॉम्प्युटर सेंटर
२३ नवी रामदासपेठ, नागपूर
मोबाइल : ९३७०१३८३७०

मुखपृष्ठ :
हरसुलकर ग्राफिक्स
मोबाइल : ९३७०१३८३७०

मुद्रक :
जयकृष्ण ऑफसेट,
गरोबा मैदान, नागपूर

# हरि ॐ

# गुरुदक्षिणा

ओम् सर्वाधारं सर्व बुध्दिप्रकाशं ।
सर्वाकारं चिन्मयं प्रेमरूपम्
नित्यंम् शुध्दम् निश्चलं निर्विकारं ।
पूर्णात्मानं सद्गुरु तं नमामि ।।

पं. पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद व
पं पू. सद्गुरु स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती
यांचे चरणी 'चिन्मय शिक्षणोपनिषद्' ही
गुरुदक्षिणा सादर अर्पण

डॉ.सौ.वसुधा विनोद देव
अकोला.

# परमपूज्य स्वामी पुरूषोत्तमानन्द सरस्वती यांचा संदेश
## ॐ श्री चिन्मय सद्गुरूदेवाय नमः।

आधुनिक जगांत मानवी सुखार्थ, विशेषतः विज्ञानक्षेत्रात व तदनुरूप शिक्षणक्षेत्रात केलेली प्रगती आश्चर्यकारक आहे. विज्ञानाद्वारे मानवाला सुख मिळावे म्हणून केलेले संशोधन व संशोधक अभिनंदनीय आहेत.

तरीपण, प्रत्यक्ष जीवनाचे अवलोकन केले असता, प्राचीन काळापेक्षा आधुनिक यंत्रयुगात सभोवताल सर्व सुखसोयी असूनहि बाह्यसुखाची साधने व समृद्धीमध्ये बसून, माणूस खरा सुखी न होता, ताण–तणाव, विक्षेप, गोंधळ, अशांती इत्यादी अनुभवून आंतल्या आंत गुदमरल्यासारखा होऊन दुःख भोगतांना दिसून येतो. हा विरोधाभास कां?

आधुनिक महान ऋषि परमपूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानन्द महाराजांनी आजच्या जीवनाचे जवळीकतेने अवलोकन करून, सखोल चिंतनपूर्वक आपला निष्कर्ष व्यक्त केला. ते म्हणतात –

'The tragedy of human history is decreasing happiness in the midst of increasing comforts."

भावार्थ – अद्ययावत सुखसोयी सतत वाढल्या असूनही, प्रत्यक्षांत माणसाचे सुख मात्र न्हास पावत आहे, सारांश – बाह्य सर्व भौतिक सुखसोयी असून, माणूस असमाधानी किंवा दुःखी होत आहे. ही शोकांतिका आहे. असे कां? या प्रश्नातच त्याचे उत्तर आहे. विचार केल्यास हे स्पष्ट होते की त्या समस्येचे कारण बाहेर नसून आंत आहे. अंतःकरणात (मनात) आहे. माणसाला हे समजत नाही की सुख–दुःख केवळ बाह्य व्यवस्थेवर अवलंबून नसून आंतरिक मनाच्या अवस्थेवर अवलंबून आहे. जसे मन तसा माणूस (As the mind, so the man). आपल्या दैनंदिन अनुभवातूनहि हे स्पष्ट होते. 'माझे मन सुखी तर मी सुखी व माझे मन दुःखी तर मी दुःखी' असा तुमचा आमचा सर्वांचा अनुभव आहे. आज विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की माणसाने चंद्रापर्यंत झेप घेतली आहे, पण मानवाने आतला चंद्र कांही पाहिला नाही. बाह्य व्यवस्थापन (Objective Management) माणसाला माहीत आहे पण आंतरिक व्यवस्थापन (Subjective Management) माणूस जाणत नाही. अर्थात बाह्य सुखात असूनहि, माणूस आंतरिक दुःख भोगतो. याचे वर–वर कांहीही कारण दिसले, तरी मुख्य कारण म्हणजे आधुनिक शिक्षणातून मानवाला फक्त आपल्या सभोवतालचे ज्ञान (Knowledge around the Self) भरपूर लाभले आहे, पण आपल्या बाबतचे ज्ञान (Knowledge about the Self) नाही. परिणामतः विक्षिप्त मनामुळे सामाजिक स्वास्थ्य, आपसातील प्रेम, आदर संबंध व शांतता नष्ट होत चालली आहे. त्यामुळे विज्ञानाच्या विकासाला आध्यात्मिक विचाराची जोड देणे, ही काळाची गरज आहे.

'व्यक्तिविकासाद्वारे राष्ट्रविकास–जगताचा विकास' (World development through individual development) हे शिक्षणाच्या विकासाचे मुख्यसूत्र परम पूज्य गुरुदेवांनी निर्देशित केले आहे. व्यक्ति–विकास हा व्यक्तिमत्व विकासाद्वारेच शक्य आहे. त्यासाठी शारिरिक, मानसिक, बौद्धिक विकास शिक्षणाच्या माध्यमातून जीवनमूल्यासहित साधून, ज्या शक्तिमुळे हे सर्व व्यक्ति व व्यक्तिमत्वाचे कार्य यांचा विकास होतो, त्या आध्यात्मिक 'व्यापक दृष्टीचाहि' शिक्षणात अंतर्भाव असावा, जेणेकरून शिक्षणक्षेत्रात, अध्ययन करणारे (विद्यार्थी) व अध्यापन करणारे (अध्यापक) स्वतःचा आत्मविकास करून, समाजासाठी, देशासाठी निःस्वार्थ सेवा कार्य करू शकतील, अशा जीवनमूल्ययुक्त शिक्षण प्रणालीवर परम पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानन्दांनी विशेष भर दिला आहे. ही दृष्टि ठेवून भारतात ७५ पेक्षा जास्त चिन्मय विद्यालये व महाविद्यालये प्रगतपणे कार्यरत आहेत. त्यासाठी त्यांनी समाजाला–राष्ट्राला इतकेच नव्हे तर आधुनिक जगताला तात्विक अधिष्ठान असलेली नवीन शिक्षणदिशा दाखविली आहे. या संदर्भात चिन्मय मिशनचा Chinmaya Vision Program (C.V.P.) महत्त्वाचा आहे.

डॉ. वसुधा देव यांनी अत्यंत परिश्रम व अभ्यासपूर्वक परम पूज्य स्वामी चिन्मयानन्दजी यांच्या शिक्षणासंबंधी अनेक ग्रंथांतील विचारांचे संकलनकरून, तसेच त्याबाबत अनेक कार्यकर्त्यांशी संपर्क साधून प्राप्त केलेल्या शैक्षणिक विचारांचे निरनिराळ्या उपयुक्त विषयानुसार संपादन करून, "परम पूज्य स्वामी चिन्मयानन्द यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास" हा लघुशोध प्रबंध यापूर्वी प्रकाशित केलेला आहेच. तो शिक्षणक्षेत्रातील संशोधक व अभ्यासक यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त व लाभदायक ठरणारा आहे.

त्या सविस्तर ग्रंथाचे आधारे, त्यातील शिक्षणोपयोगी सारभूत प्रस्तुत 'चिन्मय शिक्षणोपनिषद्' हे साधारण ३०० पानी पुस्तक या ३ ऑगस्ट २००१ ह्या परम पूज्य गुरुदेवांच्या महासमाधीच्या आराधनादिनी प्रकाशित होत आहे. हा प्रसंगोचित महान योग आहे. त्याबाबत डॉ. वसुधा देव यांचे हार्दिक अभिनंदन!

प्रस्तुत ग्रंथाचा लाभ जास्तीत जास्त जिज्ञासू व शिक्षणप्रेमी घेवोत ही शुभकामना!

सर्वांना प्रेम, क्षेम व हरिःॐ!
जय गुरुदेव! जय जगदीश्वर!

३ ऑगस्ट २००१

स्वामी पुरुषोत्तमानन्द सरस्वती

# प्रस्तावना

प.पू. स्वामी चिन्मयानंद आमचे गुरुदेव जे स्वत: भौतिक शिक्षणाच्या दृष्टीने एम.ए.एल.एल.बी. जर्नालिस्ट होते. त्यांचे व्यक्तिमत्व कणखर होते वक्तृत्व व लेखन प्रखर होते. पूर्वाश्रमींच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. त्यासाठी ते कारागृहातही गेले होते. त्यानंतर हिमालयात तपश्चर्या करुन प.पू. तपोवन महाराजांच्या कृपेने आपला स्वत:चा आध्यात्मिक विकास करुन उध्दार केलाच पण 'आत्मनो मोक्षाय जगत् हितयच, 'या उक्तीप्रमाणे जागतिक स्तरावर बालकापासून प्रौढांपर्यंत सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी झटून प्रयत्न केले व जगाला अमूल्य असे मार्गदर्शन केले त्यांचे दिव्य व प्रगल्भ असे अध्यात्मिक व शैक्षणिक विचार लेखनातून अनेक ग्रंथाद्वारा प्रकाशित झाले. गुरुदेवानी शिक्षणाचा आधुनिक दृष्टीकोन समोर ठेवून समाजाला शिक्षणाची नवीन दिशा दाखविली पण आतापर्यंत त्यांच्या ग्रंथाच्या लेखनावर सखोल अभ्यास करुन त्यातून सर्व समाजाला मार्गदर्शन होईल असा प्रबंध लिहीला गेला नव्हता ती उणीव भरुन निघाली चिन्मय मिशनच्या सेविका डॉ. सौ. वसुधा देव (अधिव्याख्याता) यांनी प.पू. गुरुदेवाचे जेष्ठ शिष्य प. पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सतत तीन वर्ष सखोल चिंतन केले व सर्व वाङ्मय अक्षरश: घुसळून काढले. त्यातून प. पू. गुरुदेवाच्या शैक्षणिक विचारांचे नवनीत निघाले व ते प्रबंध रुपाने जगासमोर आणले. प्रस्तुत प्रबंधास विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता देऊन अनुदानही दिले. सौ. वसुधा देव यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहे. सी.व्ही.पी. ((चिन्मय व्हीजन प्रोग्रॅम) ने शिक्षणाचा व्यवहारीक आयाम जगासमोर आणला आहे. त्याबरोबर आता शिक्षणाचे तात्विक अधिष्ठान हे या प्रबंधाद्वारे जगतासमोर येईल अशी खात्री वाटते. शिक्षणक्षेत्रातील अभ्यासक व संशोधकांसाठी हा प्रबंध अत्यंत उपयोगी पडू शकतो. ह्या प्रबंधावर आधारित चिन्मय शिक्षणोपनिषद् हा स्वतंत्र ग्रंथ आपणासमोर येत आहे. प.पू. गुरुदेवानी केलेली शिक्षणाची

परिभाषा म्हणजे मन व बुध्दीचा समन्वय. व्यक्तिमत्व विकास हा शारिरीक मानसिक बौध्दिक व अध्यात्मिक या स्तरावर प्राथमिक अवस्थेपासून कसा करावा याचे विवेचन या ग्रंथात केलेले आहे. शिक्षण घेणे म्हणजे केवळ पदवी घेणे नसून नितीमूल्याची जोपासना करुन सुसंस्कृत होणे होय. शिक्षणाचे वेगवेगळे पैलू त्यांच्या विवेक चुडामणी सारख्या अनेक ग्रंथावरील विवेचनातून पाहावयास मिळतात. स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार हे गुरुदेवांच्या संकल्पनाशी मिळते जुळते वाटतात. शिक्षण संकल्पना जीवनचे ध्येय, व्यक्तीमत्व विकास धर्म संकल्पना, मन आणि मानसशास्त्र, विज्ञान व तत्वज्ञान, व ज्ञान मिमांसा पर्यावरणाचा विचार बालक युवक यांच्या शिक्षणाचा दृष्टीकोन, मूल्यशिक्षण, विविध व्यवस्थापन संकल्पना, या सर्वांचा सखोल विचार करुन व्यक्ती घडविणे म्हणजे शिक्षण होय.

एक एक व्यक्ती मिळून समाज व राष्ट्राची धारणा होते. त्यामुळे एक एक व्यक्ती विकसित झाली तर राष्ट्र आपोआप विकसित होईल. हे सर्व ज्ञान आत्मसात करण्यास गुरुशिष्य सबंध हे दृढ असले पाहिजे. तेव्हाच 'या ''हृदयीचे त्या हृदयी'' हया उक्तीनुसार सर्व ज्ञान हे गुरुच्या हृदयातून शिष्याच्या हृदयात प्रवाहीत होते. हयाचे सविस्तर विश्लेषण हया ग्रंथात केले आहे. वरील मुदयावर सखोल विचार करुन आधुनिक शास्त्र व वर्तमान कालीन विचारसरणीनुसार सर्व शिक्षणसंकल्पना कशा अंमलात आणता येईल याबाबत गुरुदेवाची दृष्टी व त्याचा सुंदर आराखडा या ग्रंथामध्ये लेखिकेने आकर्षकपणे मांडला.

भविष्यकाळात प. पू. गुरुदेवाच्या शिक्षण विषयक विचारप्रणालीचा प्रामुख्याने विचार केला जावून त्यांची अमंलबजावणी झाली तर नक्कीच शिक्षण क्षेत्र विकासाचे उच्च शिखर गांठल्याशिवाय राहणार नाही. सौ. वसुधाने प्रदीर्घकाळ चिंतनात्मक अभ्यास करुन गुरुदेवाच्या शिक्षणाच्या बाबतीत तात्विक अधिष्ठान यावर जोर देवून 'चिन्मय शिक्षणोपनिषद्' पूर्ण केले त्याबद्दल मी तीचे अभिनंदन करते. त्याचबरोबर तीचे पती

श्री विनोद देव यांचे विशेष हार्दिक अभिनंदन तसेच तिघा मुलगा चि. चिन्मय देव ह्याचेही मी अभिनंदन करते व ज्यांनी ज्यांनी या कार्यात सहकार्य दिले या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

३ ऑगस्ट २००९ पं.पू. गुरुदेवांच्या महासमाधि सोहळयाच्या दिवशी पं.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद यांच्या हस्ते 'चिन्मय शिक्षणोपनिषद्' चे प्रकाशन होत आहे. ही परम् भाग्याची गोष्ट आहे. सर्व चिन्मय प्रेमी साधक कार्यकर्ते यांनी शिक्षणोपनिषदावर लक्ष केंद्रीत करुन या गुरुदेव प्रणित शिक्षण प्रणालीचा प्रचार सर्वस्तरावर करावा ही कळकळीचे विनंती.

'अज्ञानाची करुनी होळी ! शिक्षण देवून व्हावी दिवाळी'' ही संतोक्ती सार्थ व्हावी ही सदगुरु चरणी प्रार्थना

सर्वांना हरि ॐ।। प्रणाम प्रेम क्षेम हरि ॐ।।

जय गुरुदेव
जय जगदीश्वर

१० ६ २००९.

स्वामीनी मंगलानंदा

हरि: ॐ

# मनोगत

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।।

भारतीय तत्वज्ञानातील रत्नभंडार म्हणजे प्राचीन उपनिषदे ह्यालाच वेदांत असेही म्हणतात. उप-नि-षद ह्याचा अर्थ जे वाङ्मय अभ्यासकांना, साधकांना परमश्रेष्ठ ज्ञानाच्या जवळ जाण्यास, त्याला प्राप्त करण्यास मदत करते ते, असा होतो. ह्या उपनिषदात ब्रह्मज्ञानाची चर्चा गुरुशिष्य संवादातून केली आहे. उपनिषदाच्या अभ्यासाला ब्रह्मविद्या असेही म्हणतात. अभ्यासाच्या ह्या वाटेवर चार महावाक्यांची अनुभूती होणे हा उपनिषदाचा उद्देश आहे. असत्याचा निरास सत्यतत्वाची प्राप्ती आणि जीवनाची कृतार्थता ह्या सर्व पातळीवर उपनिषदे आपणास मार्गदर्शन करतात. स्वामी चिन्मयानंद म्हणतात, "आपल्यामध्ये एक दिव्य स्फुल्लिंग आहे की जे ज्ञान स्वरूप आत्मा आहे त्याची अनुभूती घेता येण्यासारख्या सत्यतत्वाचे निर्देशन करणे हे उपनिषदाचे काम आहे. आपला भ्रामक खोटा अहंभाव टाकून देऊन 'शिवोहम्' स्वरूप जाणून घेणे हीच वेदांताची गर्जना आहे." उपनिषदांचा हाच खरा उद्देश.

"चिन्मय शिक्षणोपनिषद" ह्यात शिक्षणाबाबतच्या अनेक भ्रामक समजुतीचा निरास होतो. चिन्मय शिक्षणोपनिषदातून होणारी उत्पत्ती म्हणजे 'खरे शिक्षण', खरा शिष्य ज्ञानी गुरु ही संकल्पना जाणू शकतो" आणि तीसरी बाब म्हणजे शिक्षण व जीवन ह्याचे ऐक्य ह्या तीन महत्वाच्या तत्वांचे निर्देशन व त्यातून साकारलेली व्यक्तिमत्त्व विकासाची, समतोलाची क्षमता व ह्यातून साध्य होणारी जीवनाची सार्थकता व ह्या सर्वांचा परिणाम म्हणून एका समर्थ राष्ट्राची निर्मिती असे राष्ट्र ज्याचा पाया हा अध्यात्म आहे व ज्याने विज्ञानाचेही बोट धरले आहे व समर्थपणे वाटचाल करतो आहे व आपल्या उज्ज्वल व दैदीप्यमान संस्कृतीची धर्माची पताका जगभर नेतो आहे.

शिक्षणोपनिषदात मिळणारे मार्गदर्शन हे प्रत्येक शिक्षणसाधकाच्या मनात उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास समर्थ असे आहे ह्या ठिकाणी गुरु आहेत. प.पू. स्वामी चिन्मयानंद व शिष्य आहे असा प्रत्येक शिक्षण साधक जो आज विपर्यास झालेल्या शिक्षण संकल्पनांनी व्यथित झाला आहे व त्याच्या मनात अनेक प्रश्नांनी अक्षरश: काहूर माजविले आहे हे प्रश्न आहेत. शिक्षणाचा खरा अर्थ काय? शिक्षणाच्या दृष्टिकोनातून जीवन ध्येय काय असावे? शिक्षणाचे ध्येय काय असावे? व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा आशय काय? मूल्य व मूल्यसंस्कार व शिक्षण ह्याचा सहसंबंध काय ? धर्म व शिक्षण यांचा संबंध काय? खरा धर्म कशाला म्हणायचे? गुरु कोण? खरा शिष्य कसा असावा? गुरु शिष्याच्या नात्याचा पाया काय? शिस्त, स्वातंत्र्य म्हणजे काय? विद्यार्थ्यांच्या योग्य विकसनासाठी कोणत्या अध्ययन अध्यापन पध्दतीचा वापर करावा? शिक्षणाच्या बाबतीत मानवी मनाचे कार्य काय? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे भारतीय शिक्षणाला त्याचा आत्मा गवसेल काय? हे सर्व प्रश्न शिष्य म्हणून असणाऱ्या शिक्षण साधकाच्या मनात उत्पन्न होतात व ह्या प्रश्नांची उत्तरे जी गुरुदेवांनी दिली आहेत त्यातून साकारतो ''चिन्मय शिक्षणोपनिषद'' ह्या उपनिषदातून निघणारे महावाक्य म्हणजे ''वेदाध्ययनाय प्रवर्तनाय'' अर्थात खरे शिक्षण जाणून घेण्यासाठी पुनश्च वेदाकडे आपणास जावे लागेल. असे हे 'चिन्मय शिक्षणोपनिषद' शिक्षणसाधकांना निश्चित शैक्षणिक जीवनाची वाटचाल यशस्वी करण्याची शक्ती प्रदान करेल.

विद्यापीठ अनुदान आयोगद्वारा अनुदानीत प.पू.स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास ह्या विषयावरील संशोधन कार्य व त्यात मिळालेले प.पू.स्वामी पुरूषोत्तमानंद सरस्वती ह्यांचे मार्गदर्शन व प.पू.स्वामीनी मंगलानंदा यांचे प्रोत्साहन हा खरोखरीच एक दिव्य व शब्दातीत असा अनुभव आहे. ह्यातील प्रत्येक शब्द हा गुरुदेवांचा आहे आणि म्हणूनच हे सर्व कार्य मी प.पू.गुरुदेवांच्या चरणी अर्पण करते.

।। हरी ओम ।।

– डॉ.सौ.वसुधा विनोद देव

# अनुक्रमणिका


| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण १ | स्वामी चिन्मयानंद - व्यक्ती आणि कार्य | १ |
| १) | जीवन परिचय | २ |
| २) | चिन्मय मिशन कार्य | ८ |
| प्रकरण २ | शिक्षण संकल्पना | १० |
| १) | शिक्षण | १० |
| २) | जीवनाचे ध्येय | २८ |
| ३) | गुरु शिष्य व गुरु शिष्य संबंध | ५३ |
| ४) | अध्ययन व अध्यापन पध्दती | ६५ |
| ५) | शिस्त आणि स्वातंत्र्य | ७२ |
| ६) | राष्ट्र व संस्कृती | ७५ |
| ७) | धर्मसंकल्पना व हिंदू धर्म | ८५ |
| ८) | मन आणि मानसशास्त्र | १०० |
| ९) | आजचे विज्ञान | १०७ |
| १०) | तत्वज्ञानातील काही संज्ञा | ११० |
| ११) | ज्ञानमिमांसा | १२२ |
| १२) | पर्यावरण | १२५ |
| १३) | बालकांबाबत दृष्टिकोन | १२९ |
| १४) | युवकांप्रती दृष्टिकोन | १४२ |
| १५) | सद्यस्थिती | १५७ |
| १६) | प्रौढांच्या प्रती दृष्टिकोन | १६० |
| १७) | व्यवस्थापन संकल्पना | १६२ |
| १८) | मूल्यशिक्षण | १७५ |
| १९) | व्यक्तिमत्व विकास | १९२ |
| २०) | नवनवीन संकल्पना | २१४ |

प्रकरण ३ स्वामी चिन्मयानंद ह्यांची शिक्षण विषयक दृष्टि २२३
१) शाश्वत विकासाकरीता शिक्षण २२३
२) मार्गदर्शक तत्वे २२६
३) गुणवत्तेचा संदर्भ २२७
४) सामाजिक संदर्भ २२७
५) शिक्षण २२८
६) शिक्षणाची उद्दिष्ट्ये २३०
७) शाश्वत विकासाकरीता शिक्षण – विविध उपागम २४०
बालकेंद्री शिक्षण २४०
युवा शिक्षण २४८
आत्म संयमनाचे शिक्षण २५०
समग्र व्यक्तिमत्व विकास व शिक्षण २५६
राष्ट्रीय सांस्कृतिक विकासाकरिता शिक्षण २६७
धार्मिक शिक्षण २७४
पालक शिक्षणाचा दृष्टीकोन २७५
स्त्री शिक्षण २७६
शांततेकरिता शिक्षण २७९
मूल्यविषयक दृष्टीकोन २८१
विज्ञान शिक्षण २८४
पर्यावरण शिक्षण २८५
नेतृत्वाचे शिक्षण २८८
शिक्षक प्रशिक्षण २८९
स्व व्यवस्थापनाचे शिक्षण २९१
अध्ययन अध्यापन पध्दती २९३
वयोगटानुसार शिक्षणाचा उपागम २९८
शालेय वातावरण ३०७
मूल्यांकन ३०८